
# पंडिता रमाबाई सरस्वती

माहिती संकलन: सचिन गुळीग, पुणे






▲ **जन्म:-23 एप्रिल 1858**

▲ **मृत्यू:- 05 एप्रिल 1922**

## ▲ स्थापन केलेले सदन

- कृपासदन:- पतित स्त्रियांसाठी
- सदानंद सदन:-अनाथ बालकांसाठी
- मुक्ती सदन:-1898 ख्रिस्ती साठी स्थापन
- बातमीसदन:- अंधासाठी
- शारदा सदन:- 1989 बाल विधवासाठी
- आर्य महिला समाज :- 1882 पुणे

## ▲ सरस्वती व पंडीता पदव्या

▪ पित्याने दिलेल्या संस्कृताच्या शिदोरीच्या जोरावर रमाबाई उत्तर दिग्विजयाला निघाल्या. त्या काळात त्या भारतभर हिंडल्या. आपल्या बुद्धिमत्तेने त्यांनी अनेकांना चकीत केले.

▪ कोलकत्याला तर प्रचंड मोठा समुदाय त्यांना ऐकण्यासाठी आला होता. इथेच त्यांना 'सरस्वती' आणि नंतर त्यांच्या नावाचा अविभाज्य भाग झालेली 'पंडिता' ही पदवी 1878 साली मिळाली.

▪ रमाबाईंच्या विद्वत्तेला लोकमान्यता मिळाली.

## ▲ घटनाक्रम

- ☫ 1878 : पंडिता - सरस्वती पदवी बहाल
- ☫ 1880 : बिपिन मेधावी यांच्याशी विवाह
- ☫ 1882 : आर्य महिला समाज (पुणे)
- ☫ 1882 : हंटर कमिशनपुढे साक्ष
- ☫ 1883 : ख्रिस्ती धर्म स्वीकारला
- ☫ 1887 : रमाबाई असोसिएशन स्थापना
- ☫ 1889 : मुंबईत शारदा सदनची स्थापना
- ☫ 1890 : शारदा सदनचे पुणे येथे स्थलांतर
- ☫ 1898 : अमेरिकन रमाबाई असो. स्थापना
- ☫ 1898: मुक्ती मिशनची स्थापना (केडगाव)
- ☫ 1901 : डेमी मुद्रणालयाची स्थापना
- ☫ 1903 : मुक्ति प्रेअर बेल सुरु
- ☫ 1913 : शांती सदन नावाने शाळा सुरु
- ☫ 1919 : कैसर-ए-हिंद पदवी प्राप्त

✍ संकलन: सचिन एस शिंदे

## ✍ 📚 पंडिता रमाबाईंची ग्रंथ संपदा

- ☫ 1881 : देववाणी परिदेवितम्
- ☫ 1882 : स्त्रीधर्मनीति
- ☫ 1883 : इंग्लंडचा प्रवास
- ☫ 1883 : वेदांतसार
- ☫ 1887 : हायकास्ट हिंदू वुमन
- ☫ 1904 : देव प्रीती आहे
- ☫ 1904 : मी किती सोसू
- ☫ 1905 : रोजचा उजेड
- ☫ 1905 : उद्या येणार आहे
- ☫ 1908 : एक गोष्ट
- ☫ 1909 : हिब्रू भाषेचे व्याकरण
- ☫ 1913 : प्रभु येशुचे चरीत्र
- ☫ 1917 : भविष्यकथा
- ☫ 1917 : द टेस्टीमनी

Sachin Gulig

■ संस्कृतवरील प्रभुत्वामुळे कोलकता तेथील सिनेट हॉलमध्ये त्यांचा 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करून गौरव करण्यात आला. त्यांना मराठी, कन्नड, गुजराती, बंगाली, हिंदी, इंग्लिश, संस्कृत, हिब्रू या सर्व भाषा अवगत होत्या

■ पंडिता' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई या एकमेव महिला होत. बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले.

■ 1880 साली त्यांनी कोलकत्यातील बिपिन बिहारीदास मेधावी या शुद्र वकिलांशी लग्न केले. पंडिता रमाबाई या ब्राह्मण तर त्यांचे पती शूद्र मानल्या गेलेल्या जातीचे होते. पण रमाबाईंनी चुकीच्या रूढींना झुगारून देण्याचेच ठरवले होते. दुर्दैवाने 1882 मध्ये मेधावी यांचा मृत्यू झाला.

■ 29 सप्टेंबर 1883 रोजी वाँटिज येथील चर्चमध्ये त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे बाळ गंगाधर टिळक यांच्या बरोबरच सनातनवादी विचारवंतांचा त्यांनी रोष ओढवून घेतला

■ रमाबाईनी ख्रिश्चन धर्म स्वीकारू नये म्हणून महात्मा फुले यांनी प्रयत्न केले होते.

■ त्यानंतर आपली एकुलती एक मुलगी मनोरमा हिच्यासह त्या पुण्यास येऊन स्थायिक झाल्या. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी यांसारख्या घातक चालीरीती व दुष्ट रूढींपासून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी प्रथम पुण्यात व नंतर अहमदनगर,सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी या ठिकाणी 'आर्य महिला समाजाची स्थापना केली.

■ आपल्या विचारांच्या प्रसारार्थ त्यांनी 'स्त्रीधर्मनीति' हे पुस्तक लिहिले. 1883 साली त्या आर्य महिला समाजाच्या वतीने वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या. परंतु तेथे एका महिला महाविद्यालयात (चेल्टनहॅम लेडीज कॉलेज) त्यांनी संस्कृत शिकवले.

■ फेब्रुवारी 1886 मध्ये त्या अमेरिकेस गेल्या. हिंदुस्थानातील बालविधवांना उपयुक्त होणारी 'बालोद्यान शिक्षणपद्धती' त्यांनी शिकून घेतली व त्यासंबंधी मराठी पुस्तके लिहिली.

■ तेथे त्यांनी हिंदू बालविधवांच्या परंतुप्रश्नांचा ऊहापोह करणारे 'द हायकास्ट हिंदू वूमन' हे पुस्तक लिहिले.

■ अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन त्यांनी भारतातील समस्या तेथील लोकांसमोर मांडल्या. भारतातील बालविधवांच्या कार्यात मदत करण्यासाठी काही अमेरिकन लोकांनी बॉस्टन येथे 'रमाबाई असोसिएशन'ची स्थापना केली होती. पुढील काळात त्यांनी 'युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवृत्त' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यांनी मूळ हिब्रू भाषेतील बायबलचे मराठी भाषांतरही केले

■ त्यांच्या सांगण्यावरून 'रमाबाई असोसिएशन' बंद करण्यात येऊन 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ही नवी संस्था स्थापन करण्यात आली

■ ‘शारदा सदन’ ही संस्था ख्रिस्ती संस्था म्हणून काम करणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

■ 1882 साली सरकारी विद्याविषयक हंटर आयोगासमोर त्यांनी व महात्मा फुले यांनी प्रभावी साक्ष दिली

■ 1897 मध्ये मध्य प्रदेशात व 1900 मध्ये गुजरातमध्ये पडलेल्या दुष्काळात निराश्रित झालेल्या स्त्रियांना त्यांनी या आश्रमात आश्रय दिला.

■ मुक्तिसदना' त धान्य, भाजीपाला, फळफळावळ यांचे उत्पन्न मुलींच्या मदतीने काढण्यात येई

■ प्रसिद्ध वक्तव्ये:- *मी ख्रिस्ताच्या चर्चची खरी भाविक आहे. पण बिशप किंवा ख्रिस्ती पुजाऱ्याच्या तोंडून येणाऱ्या प्रत्येक शब्दाचे पालन करण्यास मी बांधील नाही. कारण हिंदू संस्कृतीतील भिक्षुक पुरोहित संस्कृतीतून स्वतःला मी सोडवून घेतले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा तशाच प्रकारच्या भिक्षुक संस्कृतीत स्वतःला अडकविण्याची माझी इच्छा नाही.*

■ 1913 मध्ये मुक्ती सदन येथे रमाबाईंच्या कन्या मनोरमा या अंध विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीतून शिकवित असत

■ महाराष्ट्रात नऊवारी ऐवजी पाचवारी साडी नेसण्यास महिलांनी सुरुवात करण्यामागे पंडिता रमाबाई यांचे प्रयत्न होते. हा फक्त कपड्यापुरता मुद्दा नव्हता, तर स्त्री स्वातंत्र्य व स्वनिर्णयाचा हक्क हे मुद्दे महत्त्वाचे होते.

■ दुसऱ्यांकरिता अविरत कष्ट करणाऱ्या या समाजसेविकेचे व्यक्तिगत जीवन मात्र फार दुःखी होते. त्यांच्या मुलीचे 24 जुलै 1921 रोजी मिरज येथे श्वासोच्छवास व हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले

■ शेवटच्या काळात रमाबाईंनी केडगाव मिशनमध्ये अनाथ स्त्रियांसाठी नवे जग उभारण्याचा प्रयत्न केला; मात्र लवकरच रमाबाई यांचे 05 एप्रिल 1922 मध्ये केडगाव येथेच निधन झाले

संदर्भ:- Wikipedia/Wikaspedia/Google

**माहिती संकलन: सचिन गुळीग, पुणे**